**ठळक बातम्या**

- भारतासोबत भागिदारीसाठी जगभरातल्या देशांना आणि भारतात गुंतवणुकीसाठी जगातल्या उद्योजकांना प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं आवाहन

- शिक्षण, व्यापार, गुंतवणूक, तंत्रज्ञान, आरोग्य यासारख्या क्षेत्रात भारत आणि ब्रिटनमध्ये सामंजस्य करार, भारतातून मोठी गुंतवणूक मिळेल अशी ब्रिटनचे प्रधानमंत्री कीर स्टार्मर यांना आशा

- राज्यातल्या जिल्हा परिषदा, पंचायत समित्या, नगरपरिषदा आणि नगरपंचायत निवडणुकांची प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध

- विविध मागण्यांसाठी महावितरणमधल्या ९ कर्मचारी संघटना संपावर

**आणि**

- एकदिवसीय महिला विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत भारताविरुद्धच्या सामन्यात नाणेफेक जिंकून क्षेत्ररक्षणाचा दक्षिण आफ्रिकेचा निर्णय

**<><><><><>**

जगभरातल्या सर्व देशांनी भारतासोबत भागिदारी करावी आणि जगातल्या सर्व गुंतवणूकदारांनी भारताच्या आर्थिक वृद्धीच्या वेगात सहभागी व्हावं असं आवाहन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज केलं. मुंबईत ग्लोबल फिनटेक फेस्टमध्ये ब्रिटनचे प्रधानमंत्री कीर स्टार्मर यांच्यासोबत उद्योजकांना त्यांनी संबोधित केलं. याविषयी जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून

**- *- होल्ड - कॅप्सूल - -***

*(ग्लोबल फिनटेक फेस्टमध्ये प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी पायाभूत सुविधा, तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात भारताकडून होत असलेल्या विविध प्रयत्नांची माहिती उपस्थितांना दिली. जनहितासाठी भारतात डिजिटल पायाभूत सुविधा निर्माण करण्याचे प्रयत्न सुरू असल्याचं मोदी म्हणाले.*

**- *- प्रधानमंत्री बाइट १ - -***

*देशातल्या प्रत्येक जिल्ह्याला आणि प्रत्येक भाषेला AI चा लाभ व्हावा अशी आशा त्यांनी व्यक्त केली. एआयच्या नैतिक वापरासाठी भारतानं नेहमीच जागतिक व्यासपीठावर स्पष्ट भूमिका घेतल्याची आठवण त्यांनी करुन दिली. जगभरात विकसनशील देशांना भारतात विकसित केलेलं तंत्रज्ञान वाटण्यासाठी भारत नेहमीच तयार असतो, असंही प्रधानमंत्री म्हणाले.*

*त्यापूर्वी दोन्ही नेत्यांनी सीईओ फोरमला संबोधित केलं. दोन्ही देशातला व्यापार दुप्पट करण्याचं लक्ष्य २०३० पूर्वी साध्य होईल, असा विश्वास प्रधानमंत्र्यांनी यावेळी व्यक्त केला.*

**- - -होल्ड प्रधानमंत्री २ - -**

*दोन्ही देशातल्या उद्योगांना सहकार्यसाठी उपलब्ध असलेल्या विविध क्षेत्रांची माहिती त्यांनी दिली. दोन्हीकडच्या उद्योगांनी संयुक्तरित्या जगातले सर्वोत्तम उद्योग निर्माण व्हावे यासाठी प्रयत्न करावे, असं आवाहन प्रधानमंत्र्यांनी यावेळी केलं.*

*दोन्ही देशांमध्ये दूरसंचार, एआय, जैव तंत्रज्ञान, सायबर, सेमीकंडक्टर, अंतराळ या क्षेत्रात भागीदारी वाढत असल्याचं ब्रिटनचे प्रधानमंत्री कीर स्टार्मर म्हणाले. द्विपक्षीय संबंध या वर्षात मोठ्या प्रमाणात वाढले, असंही त्यांनी सांगितलं.)*

**<><><><><>**

भारत आणि ब्रिटन हे नैसर्गिक भागीदार असून लोकशाही, स्वातंत्र्य आणि कायद्याचं राज्य या मूल्यांवरचा विश्वास हा या भागीदारीचा पाया असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. मुंबईत आज राजभवनात ब्रिटनचे प्रधानमंत्री कीर स्टार्मर यांच्याशी प्रतिनिधी मंडळस्तरावर चर्चा झाल्यानंतर ते संयुक्तपणे पत्रकारांना संबोधित करत होते. याविषयी अधिक जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून

**- - -होल्ड कॅप्सूल - -**

*(ब्रिटनच्या प्रधानमंत्र्यांचा भारत दौरा हा दोन्ही देशातल्या भागीदारीतल्या व्यापक दृष्टी आणि ऊर्जेचं प्रतीक असून ही भागीदारी जागतिक स्थैर्य आणि आर्थिक प्रगतीचा आधार बनेल, असा विश्वास प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केला.*

***होल्ड - बाईट - प्रधानमंत्री ३***

*ब्रिटनमधले ९ विद्यापीठ भारतात कॅम्पस सुरू करणार असल्याचं प्रधानमंत्री म्हणाले. स्टार्मर यांच्यासोबत इंडो-पॅसिफीक क्षेत्रात शांतता प्रस्थापित करणं, युक्रेन-रशिया आणि गाझापट्टीतील संघर्ष थांबवण्याबाबत चर्चा झाल्याचं प्रधानमंत्र्यांनी सांगितलं. युक्रेन-रशिया आणि गाझातील संघर्षावर शांततापूर्ण मार्गाने तोडगा काढावा यासाठी भारताचा पाठिंबा असल्याचंही त्यांनी स्पष्ट केलं. भविष्यातल्या गरजा लक्षात घेऊन दोन्ही देश सहकार्य वाढवत आहेत. द्विपक्षीय व्यापार करारामुळं दोन्हीकडच्या उद्योजकांना बाजारपेठेत संधी मिळेल आणि रोजगाराच्या संधी निर्माण होतील, असं स्टार्मर म्हणाले. भारतातून निघताना मोठ्या प्रमाणात रोजगाराच्या संधी निर्माण करणारे गुंतवणुकीचे करार झालेले असतील, अशी आशा त्यांनी व्यक्त केली. संयुक्त राष्ट्रांच्या सुरक्षा परिषदेत भारताला योग्य स्थान मिळावं अशी भूमिकाही त्यांनी मांडली.*

*दोन्ही देशांनी तंत्रज्ञान आणि नवोन्मेष, शिक्षण, व्यापार आणि गुंतवणूक तसंच पर्यावरण बदल, आरोग्य आणि संशोधन क्षेत्रात विविध भागीदारी करार केले. त्यानुसार दोन्ही देश संपर्क आणि नवोन्मेश तसंच एआयच्या क्षेत्रात संयुक्त केंद्र स्थापन करणार आहेत. दोन्ही देशातल्या उद्योजकांचा मंच, भारत - ब्रिटन संयुक्त आर्थिक व्यवहार समिती, हवामान बदल तंत्रज्ञान निधी, आरोग्य क्षेत्रात भागीदारी यासारख्या मुद्द्यांचा त्यात सहभाग आहे.)*

**<><><><><>**

राज्यातल्या जिल्हा परिषदा, पंचायत समित्या, नगरपरिषदा आणि नगरपंचायत निवडणुकांची प्रारूप मतदार यादी काल राज्य निवडणूक आयोगानं प्रसिद्ध केली. या यादीतली नावे mahasecvoterlist.in या वेबसाइटवर मतदारांना शोधता येतील. तहसील, नगर परिषद आणि नगर पंचायतीच्या कार्यालयातही ही यादी उपलब्ध आहे. 1 जुलै 2025 रोजी विधानसभा मतदार यादीत नाव असलेल्यांचा समावेश या यादीत करण्यात आला आहे.

**<><><><><>**

विविध प्रलंबित मागण्या आणि प्रश्नांवर प्रशासनाकडून योग्य प्रतिसाद मिळत नसल्याच्या निषेधात महावितरण मधल्या ७ कर्मचारी संघटनांनी आजपासून तीन दिवसांचा संप पुकारला आहे.

संपकाळात वीजपुरवठ्यावर परिणाम होऊ नये याकरता व्यवस्थापनानं यंत्रणा सज्ज ठेवली आहे. या आंदोलनाबाबत महाराष्ट्र अत्यावश्यक सेवा परिरक्षक अधिनियम - मेस्मा लागू केला आहे.

संपकाळात अफवांवर विश्वास ठेवू नये आणि काही तक्रारी असल्यास टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधावा असं महावितरणनं कळवलं आहे. मदत क्रमांक आहे – १९१२

<><><><>

ई बसच्या प्रवाशांना मासिक आणि त्रैमासिक पास सवलत योजना उपलब्ध असेल अशी माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी आज दिली.  ९ मीटर ई-बस, १२ मीटर ई-बस आणि ई-शिवाई बसमध्ये हे पास उपलब्ध असतील. २० दिवसांच्या परतीच्या प्रवासाचे भाडे आकारून मासिक पास दिला जाईल. तसंच ६० दिवसांच्या परतीच्या प्रवासाचे भाडे आकारून ९० दिवसांचा पास दिला जाईल, असं सरनाईक यांनी सांगितलं. हा पास वापरून प्रवासी निमआराम किंवा साध्या बसमध्येही प्रवास करू शकतील.

<><><><>

महिला क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत आज विशाखापट्टणम् इथं भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यात सामना सुरू आहे. दक्षिण अफ्रिकेनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला आहे. भारताची सुरुवात चांगली झाली. मात्र नंतर फलंदाज झटपट बाद होत गेल्यानं धावगती मंदावली. नंतर रिचा घोषनं दमदार फलंदाजी करत डाव सावरला.

शेवटची बातमी हाती आली तेव्हा भारताच्या ४७ व्या षटकात ७ बाद २१२ धावा झाल्या होत्या.

पावसामुळे हा सामना उशीरा सुरु झाला असला तरी त्यामुळे षटकांची संख्या कमी केलेली नाही.

<><><><>

साहित्य निर्मितीसाठीचा नोबेल पुरस्कार यंदा हंगेरियन लेखक लास्लो क्राझनाहोर्काई यांना जाहीर झाला आहे. आधुनिकोत्तर मानल्या जाणाऱ्या विषय कल्पनांवर लिहीणारे लेखक म्हणून ते प्रसिद्ध आहेत.  २०१५मधे त्यांना मॅन बुकर आंतरराष्ट्रीय पुरस्कार मिळाला होता. कादंबरी, कथा, लघुकथा,  निबंध,  अशा विविध साहित्यप्रकारात त्यांनी

मुशाफिरी केली आहे. त्यांच्या काही पुस्तकांवर चित्रपट तयार झाले. त्यांचं पटकथा लेखनही लास्लो यांनी केलं होतं.  सतांतांगो, द मेलांकॉली ऑफ रेझिस्टन्स, द वर्ल्ड गोज ऑन ही त्यांची पुस्तकं आंतरराष्ट्रीय स्तरावर गाजली आहेत.

<><><><><>

गेल्या २४ तासात विदर्भात हलक्या स्वरुपाचा पाऊस पडला. कोकण आणि मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी ठिकाणी पाऊस पडला.

येत्या दोन दिवसात कोकण, आणि मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे. या काळात मराठवाडा आणि विदर्भात हवामान कोरडं राहील.

//<><><><><>//